Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18844047

# १९ व्या शतकातील भारतातील केंद्र-राज्य संबंध : एक अभ्यास

**सय्यद तोफीक रब्बानी[1] & प्रा.डॉ. फारुकी मोहम्मद खय्युम[2]**

**प्रस्तावना:**

भारत हे जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र असून त्याची राज्यव्यवस्था संघराज्यीय (Federal) स्वरूपाची आहे. भारतीय संविधानाने केंद्र आणि राज्य यांच्यात अधिकारांचे स्पष्ट विभाजन करून एक संतुलित प्रशासन यंत्रणा उभारली आहे. तथापि, भारताचा संघराज्यवाद हा अर्ध-संघराज्यीय (Quasi-Federal) स्वरूपाचा मानला जातो, कारण आपत्कालीन परिस्थितीत केंद्राला अधिक अधिकार प्राप्त होतात.

21व्या शतकात भारतामध्ये जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण, माहिती-तंत्रज्ञान क्रांती, आर्थिक सुधारणा, तसेच बदलती राजकीय परिस्थिती यांमुळे केंद्र–राज्य संबंधांचे स्वरूप लक्षणीयरीत्या बदलले आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र–राज्य संबंधांचा चिकित्सक अभ्यास करणे अत्यंत महत्वाचे ठरते.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1.केंद्र–राज्य संबंधांची घटनात्मक चौकट समजून घेणे.

2.विधायी, प्रशासकीय आणि आर्थिक संबंधांचा अभ्यास करणे.

**केंद्र–राज्य संबंधांची संकल्पना**

केंद्र–राज्य संबंध म्हणजे केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यातील अधिकार, कर्तव्ये, जबाबदाऱ्या व सहकार्य यांचे परस्परसंबंध.

भारतीय संविधानात हे संबंध मुख्यतः तीन प्रकारात विभागले आहेत :

भारतीय राज्यघटना संघराज्यीय स्वरूपाची असल्याने केंद्र व राज्यांमध्ये कायदेविषयक, कार्यकारी / प्रशासकीय व वित्तीय अधिकारांची विभागणी करण्यात आली आहे. मात्र न्यायविषयक अधिकारांची विभागणी करण्यात आलेली नाही, कारण घटनेने केंद्रीय तसेच राज्य कायद्याच्या अंमलबजावणीसाठी एकाच एकात्मिक न्यायव्यवस्थेची निर्मिती केली आहे.

जरी केंद्र व राज्य सरकारे आपापल्या क्षेत्रात सर्वोच्च असले तरी संघराज्यीय व्यवस्थेच्या प्रभावी कार्यचालनासाठी त्यांच्यामध्ये महत्तम सुसंवाद व समन्वयाची आवश्यकता आहे. त्यामुळे केंद्र व राज्यांमधील संबंधाच्या विविध बाजूंचे नियमन करण्यासाठी घटनेत विस्तृत तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

[1] राज्यशास्त्र विभाग, मिलीय कला, विज्ञान व व्यस्थापन शास्त्र महाविद्यालय, बीड
[2] राज्यशास्त्र विभाग प्रमुख, मिलीय कला, विज्ञान व व्यस्थापन शास्त्र महाविद्यालय, बीड

केंद्र-राज्य संबंधांचा अभ्यास तीन आधारावर केला जातोः

1. कायदेविषयक संबंध
2. प्रशासकीय संबंध
3. वित्तीय संबंध

वरीलपैकी केंद्र व राज्यांमधील कायदेविषयक संबंधांची तरतूद घटनेच्या भाग XI च्या प्रकरण 1 मधील कलम २४५ ते २५५ दरम्यान, तर प्रशासकीय संबंधांची तरतूद भाग XI च्या प्रकरण II मधील कलम २५६ ते २६३ दरम्यान करण्यात आली आहे. केंद्र-राज्यांमधील वित्तीय संबंधांची तरतूद भाग XII च्या प्रकरण I मधील कलम २६८ ते २९३ दरम्यान करयाशिवाय, न्यायालयीन व घटनात्मक यंत्रणा या देखील केंद्र–राज्य संबंधांवर प्रभाव टाकतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते,

“हा एक संघीय संविधान आहे, कारण तो दुहेरी शासनव्यवस्थेची स्थापना करतो. यामध्ये केंद्रस्थानी संघीय सरकार असते आणि त्याच्या परिघावर राज्य सरकारे असतात. ही दोन्ही सरकारे संविधानाने निश्चित केलेल्या क्षेत्रांमध्ये सर्वोच्च सत्तेचा वापर करतात.”

डी. डी. बासू यांचे मत असे आहे की,“भारतीय संविधान ना पूर्णपणे एकात्मक आहे, ना पूर्णपणे संघात्मक; तर ते दोन्हींचे मिश्रण आहे.”

नॉर्मन डी. पामर यांच्या मते,“भारतीय प्रजासत्ताक हे एक संघराज्य आहे आणि त्याला स्वतःची काही वैशिष्ट्ये आहेत, ज्यांमुळे संघराज्य स्वरूपाला भारतीय ढंग प्राप्त झाला आहे.”

डॉ. सुभाष कश्यप यांच्या मते,“संविधान दुहेरी शासनव्यवस्थेची स्थापना करते. शासनाच्या दोन स्तरांचा समावेश आहे—संघ सरकार आणि घटक राज्य सरकारे. संविधानाने संघ व राज्य सरकारांमध्ये अधिकारांचे विभाजन केले आहे. तथापि, संघराज्यवादाची ही बाह्य लक्षणे असली तरी भारतीय संविधानाचा मूलभूत स्वर एकात्मकतेकडे झुकणारा आहे.”भारतीय संविधानकर्त्यांनी संविधान तयार करताना भारतीय राजकीय व्यवस्थेचा स्वरूप एकात्मक असावा की संघात्मक, याबाबत सखोल विचार केला. सविस्तर चिंतनानंतर त्यांनी मध्यम मार्ग स्वीकारला. त्यानुसार भारतीय संविधान बाह्य स्वरूपाने संघात्मक, परंतु आंतरिक स्वरूपाने एकात्मक आहे.

संविधानाच्या भाग १ मधील अनुच्छेद १(१) नुसार भारताला “राज्यांचा संघ” (Union of States) असे संबोधण्यात आले आहे. संविधानात जरी संघराज्यवादाची काही लक्षणे आढळतात, तरी एकात्मक राज्याच्या लक्षणांचे प्राबल्य स्पष्टपणे दिसून येते. विशेष म्हणजे, भारतीय संविधानात कुठेही ‘Federation’ (संघ) हा शब्द वापरण्यात आलेला नाही; त्याऐवजी ‘राज्यांचा संघ’ हा शब्दप्रयोग करण्यात आला आहे. याचा स्पष्ट अर्थ असा की भारत हा संघराज्य आहे, मात्र तो राज्यांच्या इच्छेवर आधारित संघ नसून, अविभाज्य व अखंड स्वरूपाचा संघ आहे

21व्या शतकातील केंद्र–राज्य संबंधांची बदलती वैशिष्ट्ये

1) सहकारी संघराज्यवाद (Cooperative Federalism)

21व्या शतकात केंद्र आणि राज्य यांच्यात संघर्षाऐवजी सहकार्य वाढवण्यावर भर देण्यात आला आहे.

NITI आयोगाची स्थापना (2015) हे याचे महत्त्वाचे उदाहरण आहे. योजना आयोगाच्या जागी स्थापन झालेल्या NITI आयोगाने राज्यांना धोरणनिर्मिती प्रक्रियेत सक्रिय सहभाग दिला. यामुळे धोरणनिर्मिती अधिक लोकशाही व विकेंद्रित झाली.

2) स्पर्धात्मक संघराज्यवाद (Competitive Federalism)

आजच्या युगात राज्यांमध्ये विकासासाठी स्पर्धा निर्माण झाली आहे.स्टार्टअप धोरणऔद्योगिक गुंतवणूक आकर्षित करणे, यामुळे राज्ये अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि विकासाभिमुख झाली आहेत.

3) GST आणि आर्थिक संबंधांतील परिवर्तनभारताच्या अप्रत्यक्ष कर रचनेत सुधारणा व कर संकलन वाढविण्यासाठी 'एक देश एक कर' प्रणाली या तत्वानुसार घटनेत २०१६ पासून १०१ वी घटनादुरुस्ती करून अनुच्छेद २४६ (अ) व सातव्या परिशिष्टात दुरुस्ती करून केंद्राला अधिकार देण्यात आले. त्यानुसार अनुच्छेद २७९ (अ) जीएसटी परिषदेची स्थापना करून केंद्राला कर निर्धारणाचे जास्त अधिकार दिलेले आहेत. त्यासोबतच सेस, अधिभार इ. कर केंद्राला लादता येतात. म्हणजेच राज्यांना उपकार व अधिकार लादण्याचा अधिकार आता राहणार नाही. २०१७पासून संपूर्ण देशभर जीएसटी कर प्रणाली लागू करण्यात आली. या जीएसटी परिषदेमुळे राज्य विषयावर कर ठरविण्याचा अधिकार आता राज्यांनी गमावलेला आहे. त्यामुळे राज्यांना आपला खर्च भागविण्यासाठी केंद्रावर अवलंबून राहावे लागत आहे. या प्रणालीनुसार सर्व कर संकलन केंद्राकडे आहे. त्यामुळे राज्याचा जी.एस.टी. हिस्सा देण्याला केंद्र सरकार टाळाटाळ करत आहे. त्यातही पक्षीय भेद मोठ्या प्रमाणात पाळला जातो. जीएसटीमुळे कर संकलनात वाढ झालेली आहे. वस्तू व सेवा कर (GST – 2017) लागू झाल्यानंतर केंद्र–राज्य आर्थिक संबंधात मोठा बदल झाला. करप्रणाली सुलभ झाली. एकसंध राष्ट्रीय बाजारपेठ निर्माण झाली. मात्र राज्यांची आर्थिक स्वायत्तता काही प्रमाणात मर्यादित झाली. GST कौन्सिलमध्ये निर्णय सहमतीने घेतले जातात, ही संघराज्यवादाची सकारात्मक बाजू आहे.

**निष्कर्ष**

21व्या शतकात भारतातील केंद्र–राज्य संबंध अधिक गतिमान, गुंतागुंतीचे व बहुआयामी झाले आहेत. सहकारी व स्पर्धात्मक संघराज्यवादाच्या माध्यमातून विकासाची नवी दिशा मिळाली असली, तरी केंद्रीकरणाची प्रवृत्ती, राजकीय हस्तक्षेप व आर्थिक असमतोल ही गंभीर आव्हाने कायम आहेत. म्हणूनच घटनात्मक मूल्ये, परस्पर सन्मान, सहकार्य आणि समन्वय या तत्त्वांच्या आधारेच भारताचा संघराज्यवाद अधिक बळकट होऊ शकतोसंघराज्य व्यवस्था ही अशी शासनपद्धती आहे की ज्यामध्ये विविध घटक (एकक) एकत्र येऊन सामान्य समस्यांसाठी संयुक्त धोरणे ठरवतात व संयुक्त निर्णयांद्वारे त्या समस्यांचे निराकरण करतात. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, संघराज्यवाद हा राष्ट्रीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठीचा एक संवैधानिक यंत्रणा आहे, ज्यामध्ये देशातील केंद्रीकरण व विकेंद्रीकरण या परस्परविरोधी प्रवृत्तींचे समन्वय साधून ‘विविधतेत एकता’ सुनिश्चित केली जाते.

**संदर्भ:**

1.भारत सरकार. (1950). भारतीय संविधान. भारत सरकार प्रकाशन विभाग.

2.भारत सरकार, गृह मंत्रालय. (1988). केंद्र–राज्य संबंधांवरील सरकारिया आयोगाचा अहवाल. भारत सरकार.

3.भारत सरकार, गृह मंत्रालय. (2010). केंद्र–राज्य संबंधांवरील पुंछी आयोगाचा अहवाल. भारत सरकार.

4.लक्ष्मीकांत, म. (2020). भारतीय राज्यव्यवस्था (6 वी आवृत्ती). मॅकग्रा हिल एज्युकेशन.

5 .बासू, दि. द. (2018). भारतीय संविधानाची ओळख (22 वी आवृत्ती). लेक्सिसनेक्सिस.

6 .राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (NCERT). (2020). भारतीय संविधान कार्यरत (इयत्ता 11 वी). एनसीईआरटी.

7 .ऑस्टिन, ग. (1999). भारतीय संविधान: लोकशाहीचा अनुभव. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*